01 JUL 2023 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग इमारतीचे भूमिपूजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठामधील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या स्वतंत्र इमारतीचे भूमिपूजन आज कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. या इमारतीला तळमजला आणि दोन मजले असणार असून पहिल्या टप्प्यामध्ये तळमजल्याचे काम प्रस्तावित आहे.

विद्यापीठाच्या स्वनिधीतून होत असलेल्या या इमारतीसाठी ६ कोटी ३८ लाख ५८ हजार रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे बांधकाम हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, आजीवन अध्ययन केंद्राचे डॉ. रामचंद्र पवार, डॉ. अण्णासाहेब गुरव, डॉ. दीपा इंगवले, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या स्वतंत्र इमारतीचे भूमिपूजन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे आदी.**



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या स्वतंत्र इमारतीच्या भूमिपूजन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी उपस्थित होते.

# वाणिज्य-व्यवस्थापन विभागाची नवी तीन मजली इमारत साकारणार

## कुलगुरूंच्या हस्ते भूमिपूजन; ६ कोटी ३८ लाखांचा खर्च अपेक्षित

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठामधील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या स्वतंत्र इमारतीचे भूमिपूजन आज कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठ कॅम्पसमधील फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर फॉर सायबर सिक्युरिटीच्या शेजारी असलेल्या जागेमध्ये वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाची नवी तीन मजली स्वतंत्र इमारत साकारण्यात येणार आहे.

या नव्या इमारतीला तळमजला आणि दोन मजले असणार असून पहिल्या टप्प्यामध्ये तळमजल्याचे काम प्रस्तावित आहे. या इमारतीचे क्षेत्रफळ १४५१.७४ चौरस मीटर आहे. विद्यापीठाच्या स्वनिधीतून होत असलेल्या या इमारतीसाठी ६ कोटी ३८ लाख ५८ हजार रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. इमारतीच्या कामाचे वास्तुविशारद विशाल पाटील आहेत.

या कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, आजीवन अध्ययन केंद्राचे डॉ. रामचंद्र पवार, डॉ. आण्णासाहेब गुरव, डॉ. दीपा इंगवले, उपकुलसचिव रमेश लिधडे, उपकुलसचिव (स्थापत्य) रणजीत यादव, उपअभियंता (विद्युत) अमित कांबळे, डॉ. गिरीष कुलकर्णी, रमेश पोवार, सदानंद सबनीस यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, कार्यकारी अभियंता एस.आर. पाटील, उपअभियंता हे .मा. जोशी, शिवप्रसाद कन्स्ट्रक्शनचे अमर जाधव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
01 JUL 2023 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ वाणिज्य विभाग इमारतीचे भूमिपूजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठामधील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या स्वतंत्र इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले. विद्यापीठातील फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर फॉर सायबर सिक्युरिटी विभागानजीक असलेल्या जागेमध्ये वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या स्वतंत्र इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी भूमिपूजन करून पहिली कुदळ मारून बांधकामास प्रारंभ केला.

या इमारतीला तळमजला आणि दोन मजले असणार असून, पहिल्या टप्प्यामध्ये तळमजल्याचे काम प्रस्तावित आहे. या इमारतीसाठी ६ कोटी ३८ लाख ५८ हजार रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. इमारतीच्या कामाचे वास्तुविशारद विशाल पाटील (पुणे) असून, शिवप्रसाद कन्स्ट्रक्शन ठेकेदार आहेत. सदरचे बांधकाम हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास प्र-कुलगुरू प्रमोद पाटील यांच्यासह कुलसचिव विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता महादेव देशमुख, आजीवन अध्ययन केंद्राचे रामचंद्र पवार, आण्णासाहेब गुरव, दीपा इंगवले, उपकुल सचिव रमेश लिधडे, उपकुलसचिव (स्थापत्य) रणजित यादव, उपअभियंता (विद्युत) अमित कांबळे, गिरीश कुलकर्णी, रमेश पोवार, सदानंद सबनीस यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, कार्यकारी अभियंता एस. आर. पाटील, उपअभियंता हे. मा. जोशी, ठेकेदार अमर जाधव आदी उपस्थित होते.

लोकमत

# 'वाणिज्य'च्या इमारतीचे भूमिपूजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामधील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या स्वतंत्र इमारतीचे भूमिपूजन शुक्रवारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर फॉर सायबर सिक्युरिटीच्या शेजारी असलेल्या जागेमध्ये ही इमारत बांधण्यात येणार आहे. इमारतीच्या कामाचे वास्तुविशारद विशाल पाटील (पुणे) असून शिवप्रसाद कन्स्ट्रक्शन ठेकेदार आहेत. या कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, आजीवन अध्ययन केंद्राचे डॉ. रामचंद्र पवार, डॉ. अण्णासाहेब गुरव, डॉ. दीपा इंगवले, उपकुलसचिव रमेश लिधडे, रणजित यादव, उपअभियंता (विद्युत) अमित कांबळे, डॉ. गिरीश कुलकर्णी, रमेश पोवार, सदानंद सबनीस, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, आदी उपस्थित होते.

0 1 JUL 2023 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घ्या

## व्ही. एन. शिंदे : शिवाजी विद्यापीठामध्ये कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** हवा, पाणी व पर्यावरणाचे रक्षण, संवर्धन यासाठी पुढाकार घ्या, त्यासाठी विद्यापीठाच्या वतीने सहकार्य करू, अशी ग्वाही शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली. विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने नैसर्गिक संसाधने संरक्षण, संवर्धन आणि पाणी बचत या विषयावर कार्यशाळा झाली.

विद्यापीठाच्या निलांबरी हॉलमध्ये झालेल्या या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, राज्य नोडल अधिकारी प्रतिभा दीक्षित यांनी मार्गदर्शन केले.



शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने मंगळवारी कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी सिद्धार्थ शिंदे, प्रतिभा दीक्षित, आदी उपस्थित होते.

विद्यार्थी विकासचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी स्वागत केले. डॉ. ज्ञानराजा चिघळीकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. टी. एम. चौगले यांनी आभार मानले. प्रा. डॉ. एन. एम. पाटील, डॉ. महादेव कांबळे, डॉ. एस. एन. पाटील, प्रा. डॉ. एस. ए. सोनवणे यांची व्याख्याने झाली.

01 JUL 2023 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीसाठी छत्र संस्था महत्त्वाची : खिरवाडकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नागरी सहकारी बँकांसमोर वृद्धी साधण्याचे मोठे आव्हान आहे.



त्यादृष्टीने रिझर्व्ह बँकेने नॅशनल को-ऑपरेटिव्ह फायनान्शियल अँड डेव्हलपमेंट कंपनी छत्र संस्था निर्माण करण्याचे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. त्याचा लाभ घेऊन नागरी सहकारी बँकांनी एकत्र येऊन प्रगती साधावी, असे आवाहन संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल खिरवाडकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया अध्यासन, गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र आणि जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन यांच्यातर्फे 'छत्र संस्था आणि नागरी सहकारी बँकांसमोरील रिझर्व्ह बँकेशी निगडित समस्या समजून घेताना' विषयावर व्यवस्थापन विकास कार्यक्रमात खिरवाडकर बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व असो.चे अध्यक्ष निपुण कोरे प्रमुख उपस्थित होते.

खिरवाडकर म्हणाले, भारतातील २८ राज्यांपैकी अवघ्या ११ राज्यांत सहकारी बँका आहेत. बँकांची संख्या २२०० वरून १४०० पर्यंत खाली आली आहे. दास कमिटीने नागरी सहकारी बँकांसाठी छत्र संस्थेची शिफारस केली. त्यातून ही संस्था या वर्षअखेरपर्यंत कार्यान्वित होत आहे. देशातील नागरी सहकारी बँकांना संघटित करणे व समस्या सोडविण्यास सहाय्य करणे, हा याचा हेतू आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के, निपुण कोरे, मुंबईचे लेखापरीक्षक धनंजय गोखले आणि रिझर्व्ह बँकेचे निवृत्त अधिकारी अविनाश जोशी यांनीही मार्गदर्शन केले. बँक ऑफ इंडिया अध्यासनाचे समन्वयक डॉ. राजेंद्र पडवळ यांनी स्वागत केले. महेश धर्माधिकारी यांनी प्रास्ताविक केले.

01 JUL 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या १६८ अभ्यासक्रमांचे निकाल विहित मुदतीत

## परीक्षा संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांची माहिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च ते एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या १६८ अभ्यासक्रमांचे निकाल विहित मुदतीमध्ये लावण्यात परीक्षा व मूल्यमापन मंडळाला यश आले आहे, अशी माहिती विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली आहे.

डॉ. जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजी विद्यापीठाच्या मार्च ते एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अशा एकूण ६०० परीक्षांचे आयोजन मे-२०२३ ते ऑक्टोबर-२०२३ या कालावधीत करण्यात आलेले आहे. या परीक्षांना २५ मेपासून व्यवस्थितपणे प्रारंभ झालेला आहे. एकीकडे परीक्षा सुरू असतानाच त्या पूर्ण होतील, त्यानुसार त्यांचे मूल्यमापनविषयक कामकाजही गतीने पूर्ण करण्यात आले. विशेषतः बी.ए., बी.एस्सी. आणि बी.बी.ए. आदी अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या १६८ अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर घोषित करण्यात आले आहेत. दोन दिवसांपासून ते २८ दिवस इतक्या अल्प कालावधीत हे निकाल घोषित करण्यात यश आले आहे.

शिवाजी विद्यापीठाचा विहित मुदतीत निकाल घोषित करण्याच्या बाबतीत राज्यभरात लौकिक आहे. या बाबीचे राज्यपाल तथा कुलपती यांच्याकडूनही वेळोवेळी कौतुक झाले आहे. कुलपतींनी राज्यातील कुलगुरूंसमवेत झालेल्या चर्चेमध्ये परीक्षांचे निकाल विहित मुदतीत घोषित करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षांचे आणि त्यानंतरचे मूल्यमापनविषयक कामकाज यांचे काटेकोर नियोजन करण्यात आले.

महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, मूल्यमापन केंद्रांचे अधिकारी तथा प्रशासकीय कर्मचारी आदी घटकांनी त्यादृष्टीने काम केले आणि विद्यापीठाचे निकाल विहित मुदतीत लावण्याच्या कामी सहकार्य केले. बी.कॉम. व विधी परीक्षेचे निकाल पुढील दोन दिवसात घोषित करण्यात येणार आहेत. द्वितीय व तृतीय वर्षाची एकत्रित परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचेही निकाल दोन दिवसांत लावण्यात येतील. उर्वरित परीक्षांचे निकालसुद्धा विहित मुदतीमध्येच लागतील, यादृष्टीने परीक्षा विभागाने नियोजन केले आहे आणि त्यानुसार काम करण्यात येत आहे, असेही डॉ. जाधव यांनी सांगितले.

लोकमत

# १६८ अभ्यासक्रमांचे निकाल वेळेत जाहीर

## बी.कॉमचा निकाल दोन दिवसांत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२३ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या १६८ अभ्यासक्रमांचे निकाल वेळेत जाहीर करण्यात परीक्षा व मूल्यमापन मंडळाला यश आल्याची माहिती विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली. उन्हाळी सत्रातील परीक्षा २५ मेपासून सुरू आहेत. या परीक्षा पूर्ण होतील, त्यानुसार त्यांचे मूल्यमापनविषयक कामकाजही गतीने पूर्ण केले. बी. ए., बी. एस्सी. आणि बी. बी. ए. आदी, अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या १६८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले. बी. कॉम. व विधि परीक्षा व द्वितीय व तृतीय वर्षाची एकत्रित परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे निकाल दोन दिवसांत लावण्यात येतील.

जनसंपर्क कक्ष

0 1 JUL 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या १६८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२३ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या १६८ अभ्यासक्रमांचे निकाल मुदतीमध्ये लावण्यास यश आल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले. बी.ए., बी.एस्सी. आणि बी.बी.ए. आदी अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या १६८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले आहेत. बी.कॉम. व विधी परीक्षेचे निकाल पुढील दोन दिवसांत घोषित करण्यात येणार आहेत. उर्वरित परीक्षांचे निकालसुद्धा मुदतीमध्येच लागणार आहेत.

पुढारी

# एमबीए प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर; ७ जुलैपर्यंत ऑनलाईन नोंदणी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा सेलने (सीईटी सेल) विद्यार्थ्यांना ७ जुलैपर्यंत ऑनलाईन नोंदणी करता येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

या मुदतीनंतर नोंदणी आणि पडताळणी केलेल्या विद्यार्थ्यांचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत समावेश होणार नाही. पसंतीक्रम भरणे व पुढील प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक येत्या काही दिवसांत प्रसिद्ध केले जाणार असल्याचे सेलकडून स्पष्ट करण्यात आले. ऑनलाईन पद्धतीने प्रवेशासाठी कागदपत्रांची पडताळणी आणि अर्जांची निश्चिती करण्याची प्रक्रिया ८ जुलैला संपेल. सात जुलैनंतर नोंदणी व पडताळणी झालेल्या अर्जांचा विचार नॉन कॅप जागांसाठी केला जाणार आहे.

0 1 JUL 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘संजीवन’मध्ये एमबीए, अप्लाइड आर्टला मंजुरी : भोसले

**पन्हाळा, ता. ३०** : येथील संजीवन नॉलेज सिटीच्या संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयात एमबीए आणि अप्लाइड आर्ट ॲण्ड क्राफ्ट या दोन नवीन विद्या शाखा तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर इंजिनिअरिंग हा पदवी कोर्स व कॉम्पुटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग आणि सिव्हिल इंजिनिअरिंग हे पदविका कोर्स या अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्लीकडून मंजुरी मिळाली आहे. या वर्षी सदरचे अभ्यासक्रम सुरू होत असल्याची माहिती संजीवन ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन पी. आर. भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भोसले म्हणाले, “एम.बी.ए. आणि अप्लाईड आर्ट या दोन नवीन विद्याशाखा शिवाजी विद्यापीठाशी सलग्न असणार असून एम.बी.ए. विभागामध्ये ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट आणि मॅनेजमेंट, मार्केटिंग आणि फायनान्स मॅनेजमेंट, बिजनेस अनॅलेटीक्स तसेच इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी आणि सिस्टीम मॅनेजमेंट या चार कोर्सचा समावेश आहे. प्रत्येकाची प्रवेश क्षमता ६० विद्यार्थी इतकी असून एकूण २४० जागा असणार आहेत. तसेच अप्लाईड आर्ट यामध्ये कमर्शियल आर्ट व पेंटिंग या दोन कोर्सचा समावेश आहे. प्रत्येकाची प्रवेश क्षमता ३० विद्यार्थी इतकी असून एकूण ६० जागा असणार आहेत.

इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर इंजिनिअरींग या पदवी कोर्सच्या तसेच कॉम्पुटर सायन्स इंजिनिअरींग आणि सिव्हिल इंजिनिअरींग पदविका या कोर्सच्या प्रत्येकी ६० जागा अश्या एकून १२० जागा असणार आहेत. अभ्यासक्रमांच्या मान्यतेमुळे संजीवन नॉलेज सिटीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.”

संजीवन ग्रुप ऑफ स्कूलचे सहसचिव एन. आर. भोसले, प्राचार्य डॉ. संजीव जैन, डीन अकॅडेमिक प्रा. एकनाथ साळोखे, रजिस्टार बाळासाहेब कुंभार, अधीक्षक दिपक पाटील, प्रसिध्दी प्रमुख संग्राम पाटील, कृष्णात शिंदे, प्रफुल्ल देशपांडे, डॉ. अजित काटकर, प्रा. निशांत थरकार, प्रसाद जाधव आणि एम. सी. कुलकर्णी उपस्थित होते.

सकाळ

# तंत्रज्ञान विभागामधील ११० विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामधून ११० विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राइव्हमधून विविध राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांनमध्ये विविध पदांवर निवड झाली आहे. हे विद्यार्थी अधिविभागामधील विविध अभियांत्रिकी शाखांमध्ये पदवीच्या शेवटच्या वर्षाचे शिक्षण घेत आहेत. नामवंत कंपन्यांनी विद्यार्थ्यांना वर्षाला ३ ते ८ लाखांची पॅकेजिस देऊन निवड केली आहे. विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी देणाऱ्या या सर्व मानांकित उद्योग समूहांचे आधिविभागाने आभार व्यक्त केले. विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्राला पूरक व रोजगार संधी उपलब्ध होण्यासाठी विभागाचे प्लेसमेंट सेल अधिकारी व सहकारी सतत प्रयत्नशील असून दरवर्षी प्लेसमेंट सेलमार्फत विभागामध्ये, तांत्रिक विषयावर व्याख्यान, चर्चासत्र, करिअर, व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम व कार्यशाळांचे आयोजन होत आहे.

01 JUL 2023

सकाळ


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परीक्षा संचालक; अंतिम वर्षाच्या १६८ अभ्यासक्रमांचे निकाल विहीत मुदतीत

# बी. कॉम., 'विधी' चे निकाल दोन दिवसांत

कोल्हापूर, ता. ३० : 'शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/ एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील बी.ए., बी.एस्सी., बी. बी. ए. आदी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या १६८ अभ्यासक्रमांचे निकाल विहीत मुदतीमध्ये लावले आहेत. बी.कॉम. व विधी परीक्षेचे आणि द्वितिय व तृतीय वर्षाची एकत्रित परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचेही निकाल दोन दिवसांत लावण्यात येतील. उर्वरित परीक्षांचे निकाल सुद्धा विहीत मुदतीमध्येच लागतील. यादृष्टीने परीक्षा विभागाने नियोजन केले आहे आणि त्यानुसार काम करण्यात येत असल्याची माहिती विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी आज दिली.

'सकाळ'ने आज 'पदवीचा निकाल लागेना, अन् अर्ज भरता येईना...' या वृत्तातून सरळसेवेच्या



भरतीसाठी अर्ज करणाऱ्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांची व्यथा मांडली होती. त्यावर परीक्षा मंडळाच्या संचालकांनी जाहीर केलेल्या निकालांची माहिती दिली. उन्हाळी सत्रात पदवी व पदव्युत्तर अशा एकूण ६०० परीक्षा आयोजित केल्या आहेत. या परीक्षांचा २५ मे पासून प्रारंभ झाला. एकीकडे परीक्षा सुरू असतानाच त्या पूर्ण होतील, त्यानुसार त्यांचे मूल्यमापनविषयक कामकाजही गतीने पूर्ण करण्यात आले.

> शिवाजी विद्यापीठाने विविध अभ्यासक्रमांचे अंतिम वर्षाचे बहुतांशी निकाल युद्धपातळीवर कामकाज करून अल्प कालावधीमध्ये घोषित केले आहेत. विहीत मुदतीमध्ये निकाल जाहीर करण्याची परंपरा यंदाही जपली आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने तयार केलेल्या मूल्यमापन नियोजन तक्त्यानुसार सर्व अधिविभागप्रमुख, शिक्षक आदी सर्व घटकांनी बहुमूल्य योगदान दिले.
>
> **-डॉ. दिगंबर शिर्के,** कुलगुरू

> सध्या विविध विभागातर्फे भरती प्रक्रिया सुरू आहे. ते लक्षात घेता विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यवसाय, नोकरीसाठी अंतिम पदवीचे गुणपत्रक आवश्यक असल्याची शिवाजी विद्यापीठाला जाणीव आहे. त्यादृष्टीने झालेल्या परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत.
>
> **-डॉ. अजितसिंह जाधव,** संचालक, परीक्षा मंडळ

दोन दिवसांपासून ते २८ दिवस इतक्या अल्प कालावधीत निकाल घोषित केले आहेत. कुलपतींनी परीक्षांचे निकाल विहीत मुदतीत घोषित करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काटेकोर नियोजन केले. महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, मूल्यमापन केंद्रांचे अधिकारी, प्रशासकीय कर्मचारी आदी घटकांनी त्या दृष्टीने काम केले असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.

### अंतिम वर्षात ५२,२०० विद्यार्थी

बी.ए., बी. कॉम, बी. एस्सी.च्या अंतिम वर्षाची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ५२,२०० इतकी आहे. त्यापैकी ३३,५०० जणांचे निकाल जाहीर झाले आहेत. उर्वरीत १६,५०० विद्यार्थ्यांना निकालाची प्रतीक्षा लागली आहे.

### दृष्टिक्षेपात...

| अभ्यासक्रम | निकाल जाहीर करण्यास लागलेले दिवस |
|---|---|
| बी.एस्सी. | १८ |
| बी.ए. | २८ |
| बी.बी.ए | १५ |
| बी.व्होक. (पर्यटन व सेवा उद्योग) | ०८ |
| बी.एस्सी. (जैवतंत्रज्ञान) | ०८ |
| बी.ए. (संरक्षण अभ्यास) | ०९ |
| बी.एस्सी. (पर्यावरण) | ०९ |
| बी.एस्सी.-एम.एस्सी. (नॅनोविज्ञान) | ०६ |
| बी.एस्सी. (शर्करा तंत्रज्ञान) | ०७ |
| बी.एस्सी. (माहिती तंत्रज्ञान) | १० |
| बी.एस.डब्ल्यू. | ०५ |
| बी.ए.- बी.एड. | १७ |
| बी.कॉम. (बँकिंग व्यवस्थापन) | ११ |
| बी.सी.ए., बी.आर्क | ०२ |

सकाळ

# 'यूजीसी' कडील १८ कोटींच्या निधीसाठी पाठपुरावा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामधील विविध प्रकल्प आणि योजनासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) मिळणारा सुमारे १८ कोटींचा निधी प्रलंबित आहे. या विषयावर व्यवस्थापन परिषदेमध्ये चर्चा झाली होती. त्याबाबत व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. स्वागत परुळेकर यांनी पाठपुरावा केला. त्यांनी यूजीसीचे सचिव मनीष जोशी यांची भेट घेतली. प्रलंबित निधी लवकर विद्यापीठाला देण्याची मागणी केली. त्यावर लवकर बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन जोशी यांनी दिले. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, अधिसभा सदस्य सारंग कोल्हापूरे, अर्चना कोलेकर, संजय परमणे, विशाल गायकवाड, घनश्याम दीक्षित, धैर्यशील यादव उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
0 1 JUL 2023 तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या १६८ अभ्यासक्रमांचे निकाल वेळेत जाहीर

■ परिक्षा संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अंतिम वर्ष व सत्राच्या एकूण ६०० परीक्षांचे आयोजन मे ते ऑक्टोबर या कालावधीत करण्यात आले आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने अंतिम वर्षाच्या १६८ अभ्यासक्रमांचे निकाल दिलेल्या मुदतीत जाहीर केले असल्याची माहिती विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली आहे.

डॉ. जाधव म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर परीक्षांना २५ मेपासून व्यवस्थितपणे प्रारंभ झालेला आहे. परीक्षा पूर्ण होतील त्यानुसार मूल्यमापनविषयक कामकाजही गतीने पूर्ण करण्यात आले. बी.ए., बी. एस्सी. आणि बी.बी.ए. आदी सत्राच्या १६८ अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर घोषित केले आहेत. विहीत मुदतीत निकाल घोषित करण्याच्या बाबतीत राज्यभरात शिवाजी विद्यापीठाचा लौकिक आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा व मूल्यमापनविषयक कामकाजचे नियोजन करण्यात आले. बी.कॉम., विधी परीक्षासह द्वितिय व तृतीय वर्षाची एकत्रित परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचेही निकाल दोन दिवसांत लावण्यात येणार असल्याचे सांगितले.

**कामकाज पाहणारे सर्वच घटक अभिनंदनास पात्र : कुलगुरू डॉ. शिर्के**

शिवाजी विद्यापीठाने विविध अभ्यासक्रमांचे अंतिम वर्षाचे निकाल विहीत कालावधीमध्ये जाहीर केले आहेत. त्यासाठी विद्यापीठाने तयार केलेल्या मूल्यमापन नियोजनानुसार सर्व अधिविभागप्रमुख, शिक्षक, प्राचार्य, शिक्षक, परीक्षक, मूल्यमापन अधिकारी, कर्मचाऱ्यांनी योगदान दिले. हे सर्वच घटक अभिनंदनास पात्र आहेत.